# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रसिद्धीपत्रक

- **मिरा-भाईंदर महानगरपालिकेला ४५८९ शहरामध्ये स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ चा देशपातळीवर प्रथम क्रमांकाचा राष्ट्रपती पुरस्कार विज्ञानभवन नवी दिल्लीत प्रदान**
- **५ स्टार कचरामुक्त शहर व वॉटर प्लस मानांकन प्राप्त करून महानगरपालिकेने राष्ट्रीय पातळीवर विशेष ओळख निर्माण केली**

भारत सरकारच्या गृह निर्माण आणि शहरी कार्य मंत्रालय (MoHUA) यांच्यातर्फे आयोजित स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ च्या पुरस्कार वितरण सोहळ्यात, मिरा-भाईंदर महानगरपालिकेची '३ ते १० लाख लोकसंख्या' श्रेणीतील सर्वोत्तम शहर म्हणून झाली आहे. नवी दिल्लीतल्या विज्ञान भवन येथे झालेल्या भव्य समारंभात महामहिम, राष्ट्रपती माननीय श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते महानगरपालिकेला ४५८९ शहरामध्ये स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ चा प्रथम क्रमांकाचा राष्ट्रपती पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी (MoHUA) चे केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्री श्री मनोहरलाल खट्टर, राज्यमंत्री, गृहनिर्माण व नागरी व्यवहार मंत्रालय टोकन साहू, सन्मानीय सचिव श्री. श्रीनिवास काटिकीथला व मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी ही उपस्थित होते. मा. नगरविकास राज्यमंत्री श्रीम. माधुरी सतिश मिसाळ, महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) आणि महानगरपालिका उपायुक्त डॉ.सचिन बांगर यांनी मानाच्या पुरस्कार स्वीकारला आहे. तसेच सदर सोहळ्याला श्री. दिपक खांबित (शहर अभियंता), श्री. योगेश गुणिजन (सहा. आयुक्त), स्वच्छता निरीक्षक व मनपा सफाई कर्मचारी अशोक भोईर आणि विकास माची हे दोघे कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते.

स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ या वर्षात मिरा भाईंदर महानगरपालिकेने शहर स्वच्छतेच्या बाबतीत सर्वोत्तम कार्य करत '५ स्टार कचरामुक्त शहर' मध्ये मानांकन प्राप्त केले असून, त्यासोबतच वॉटर प्लस सिटी म्हणूनही मानांकन मिळवले आहे. "हा राष्ट्रीय पुरस्कार व मिळालेले मानांकन फक्त महानगरपालिकेचे नव्हे, तर संपूर्ण मिरा भाईंदर शहराच्या नागरिकांचा केंद्र शासनाने केलेला विशेष सन्मान आहे. आपल्या शहराने दाखवलेली जागरूकता, नागरिकांचा स्वच्छतेसाठीचा सहभाग आणि कर्मचाऱ्यांनी केलेले प्रामाणिक श्रम यामुळे हे शक्य झाले आहे. आपण पुढेही स्वच्छता हिच सेवा मानून, शाश्वत शहराकडे वाटचाल करत मिरा भाईंदर शहराची प्रगती करू." अशा भावना मा. आयुक्तांनी या यशाबद्दल प्रतिक्रिया देताना व्यक्त केल्या.

स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ हा शहरी स्वच्छतेचा देशातील सर्वात मोठा मूल्यांकन कार्यक्रम असून, यावर्षी त्याचा ९ वा टप्पा पार पडला. स्वच्छ सर्वेक्षण मूल्यांकनातील समाविष्ट घटक म्हणजे दृश्यमान स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, जलवापर, मलनिस्सारण, सफाई कर्मचारी कल्याण, नागरी प्रतिसाद याशिवाय मिरा भाईंदर शहराने इतर क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत, राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. मिरा भाईंदर शहरातील नागरिकांसाठी हा क्षण अतिशय अभिमानाचा आणि आनंदाचा आहे.मिरा भाईंदर महानगरपालिकेने वर्षभरात शहरात अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले आहेत. शहरातील सोसायटी, फ्लॅट्स, दुकाने, तसेच कार्यालय यावर क्यूआर लावून तो स्कॅन करीत कचरा व्यवस्थापन करत आहेत. तसेच सोसायटी मध्ये स्वच्छतेचे महत्वपूर्ण प्रशिक्षण देऊन कचरा वर्गीकरणाबाबत जनजागृती करत आहे. मिरा भाईंदर शहरात रोजच साधारण ५०० टन कचरा संकलित होतो तर त्यातला ३०० ते ३२५ टन ओला कचरा व १५० ते १७५ टन सुका कचरा निघतो. त्यातल्या ओल्या कचऱ्यावर प्रकिया करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेने शहरात (India's first indigenous controlled windrow composting plant) भारताचा पहिला स्वदेशी नियंत्रित विंड्रोंज कंपोस्टिंग प्रकल्प सुरू केला असून स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक मोठी झेप घेतली आहे. हा प्रकल्प आधुनिक तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक प्रक्रियांवर आधारित आहे. दिवसाला साधारण २० टन कचऱ्यावर इथे प्रकिया केली जाते. दुसऱ्या प्रकल्पात प्लाझ्मा तंत्रज्ञान वापरून 8 टन ओल्या आणि सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते. शहरात STP (Sewage Treatment Plant) प्लांट असून रोज ११० MLD सांडपाणी STP मार्फत मलप्रकीया केंद्रावर प्रक्रिया करून त्या पाण्याचा वापर शहरातील रस्ते व दुभाजक स्वच्छ करण्यासाठी केला जातो.

मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचारी आणि अधिकारी यांना या मिळालेल्या राष्ट्रीय पुरस्काराने अतिशय आनंद झाला असून त्यांना पुढच्या वाटचालीसाठी खऱ्या अर्थाने नवे बळ व ऊर्जा मिळाली आहे. येणाऱ्या काळात मिरा भाईंदर महानगरपालिका शहर स्वच्छ, सुंदर आणि हरित ठेवण्यासाठी विविध उपक्रम राबवून मिरा भाईंदर शहराची वेगळी ओळख आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील करून देतील यात काहीच शंका नाही.

मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री, मा. ना. श्री. अजित पवार, उपमुख्यमंत्री, मा. ना. श्री. प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली, मा. खासदार नरेश म्हस्के, मा. आमदार नरेंद्र मेहता यांच्या सहकार्याने व माजी सर्व पदाधिकारी यांच्या सहभागाने मिरा भाईंदर शहराने आपले नाव लौकिक देशपातळीवर तसेच राज्यपातळीवर उंचावले आहे.

याबद्दल मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी, पत्रकार बंधू व संपूर्ण शहरवासियांचे आभार व्यक्त केले.